# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## TERM – 1 (2022-23)

**GRADE: IV** — **MARKS: 40**
**SUB: MARATHI** — **TIME: 2 HOURS**

**प्रश्न १. खालील पठित कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

चक्रासमान आम्ही सर्व एकजूट राहू
परिवर्तन अन् प्रगतीकडे मार्गक्रमण करू ||१||
मातीशी नाते सांगतो रंग हिरवा ध्वजाचा
सस्यश्यामला वसुंधरा सुख अन् समृद्धीचा ||२||
राष्ट्रध्वजाचा सम्मान करू, सदैव त्याचे रक्षण
ह्यासाठी अर्पण अमुचे तन-मन-धन ||३||

**अ)खालील इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ कवितेतून शोधून लिहा.**

१. Colour - २. Wheel - ३. Flag –

**आ) खालील वाक्य चूक की बरोबर ते लिहा.**

१. केशरी रंग मातीशी नाते सांगतो.
२. राष्ट्रध्वजाचा सन्मान करू.
३. राष्ट्रध्वजासाठी आपले तन-मन-धन अर्पण करायचे नाही.

**प्रश्न २. खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४ गुण)**

१. चतुर –
२. किनारा –

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(३ गुण)**

१. माकड आणि मगरी मध्ये काय झाली
२. माकडाचा विश्वासघात कोणी केला?
३. श्वेत रंग कशाचा प्रतीक आहे?

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२ गुण)**

१. माकड कुठे राहत होते?
२. आपल्या ध्वजाला तिरंगा का म्हणतात?

**प्रश्न ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४ गुण)**

१. मगरीने माकडाशी का दोस्ती केली?
२. आपल्या तिरंगा झेंड्यामध्ये किती रंग आहेत आणि ते कशाचे प्रतीक आहेत?

**प्रश्न ६. खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

सरू एक गरीब मुलगी आहे. ती दुसरीत शिकते. तिची आई शाळेजवळच्या चौकात लिंबे विकायला बसते. थोडेफार पैसे मिळवते. त्या पैशांवर घर चालवते. सरुने खूप-खूप शिकावे, मोठे व्हावे, असे तिला वाटते. त्यासाठी ती खर्चात काटकसर करते.

सरू गुणी मुलगी आहे. ती दररोज शाळेत जाते. शाळेतून घरी आल्यावर अभ्यास करते. नंतर घरकामात आईला मदतही करते. एकदा सरुची आई आजारी पडली. आईला उठता येत नव्हते. सरू धावत शेजारच्या डॉक्टरांकडे गेली. त्यांना बोलावून आणले. डॉक्टरांनी सरूच्या आईला तपासले व आराम करायला सांगितला.

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. सरू ही एक ---------- मुलगी आहे.

२. शाळेतून घरी आल्यावर --------- करते.

३. एकदा सरूची आई ----------- पडली.

**आ)खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. सरू कितवीत शिकते?

२. सरूची आई लिंबे विकायला कुठे बसायची?

३. डॉक्टरांनी आराम कोणाला करायला सांगितला?

**व्याकरण**

**प्रश्न ७. अ) खालील अंक अक्षरात लिहा.** **(२ गुण)**

१. ३१ - २. ४० -

**आ) खालील प्राण्यांच्या बाळांची नावे लिहा.** **(३ गुण)**

१. सिंह – २. शेळी – ३.गाय –

**इ)खालील वाक्यातील विशेषणे ओळखा व लिहा.** **(३ गुण)**

१. बिचारा ससा पळून गेला.

२. मला दहा पुस्तके हवी आहेत.

३. औषध कडू आहे.

**ई)पुढील विशेषणे वापरून वाक्य बनवा.** **(२ गुण)**

१. पांढरा –

२. रंगबिरंगी –

**लेखन विभाग**

**प्रश्न ८. खालील विषयावर निबंध लिहा. (कोणताही एक)** **(५ गुण)**

१. माझा वाढदिवस

२. झाडे आपले मित्र

**********************